# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/12/2022 (गुरूवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. मौदा**:— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील धामनगाव शिवार येथे दिनांक १४/१२/२०२२ चे ००.०५ वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन अज्ञात आरोपीची पिकअप गाडी क्र. MH-31-AT-3812 चे क्रमांकाच्या वाहनाला थांबवुन तपासले असता सदर वाहन यातील पिकअप गाडी क्र. MH-31-AT-3812 मध्ये १५ गौवंश गोऱ्हे यांचे तोंड पाय दोराने बांधुन त्यांना क्लेशपणे वागणुक देवुन त्यांची कोणत्याही प्रकारची चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता अवैधरीत्या भरून घेवुन जात असतांना मिळुन आल्याने सदर वाहनातील १५ जनावरे प्रत्येकी किंमती १०,०००/—रू. प्रमाणे एकुण किंमती १,५०,०००/—रू. व पिकअप गाडी किंमती ५,००,०००/—रू असा एकुण ६,५०,०००/— रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर वाहन चालक यांचे विरूदध सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—पोलीस शिपाई नितीन भैयालाल सार्वे, ब. नं. ४४५, वय २९ वर्ष पोलीस स्टेशन मौदा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1) (d), 5 (a), 9 प्राण्याचा छळ प्रति. अधिनियम १९६० कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ११७४ हरिश यंगलवार मो. क्र. ९४२३२१९४२९ पोलीस स्टेशन मौदा हे करीत आहे.

## शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत १० कि.मी अंतरावरील मौजा बोरखेडी रेल्वे येथे दिनांक १४/१२/२०२२ चे १४.३० वा. ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— मनोज दुर्जन मेहुणे, वय ४४ वर्ष, रा. प्लॉट न ८५ मानेवाडा रोड जवाहर नगर जि. नागपूर हे महावितरण बोरी येथे काम करत असुन त्यांचे सहकारी मिळून मौजा बोरखेडी येथे विज बिल न भरलेल्या ग्राहकांची थकबाकीची वसुली व विजजोडणी कापणी करिता गेले असता आरोपी नामे— हरी रामु रावतेल, रा. बोरखेडी रेल्वे बोरी जि. नागपूर हयाने विज बिल न भरल्याने विजतोडीणीचे काम करित असतांना सरकारी कामात अळथळा आणुन शिवीगाळ करून फिर्यादीला विटेने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, ३३२, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक साखरकर पोस्टे बोरी मो. नं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**